# उपराळकर पंचविशी

## उल्हास राणे

## अध्याय चौथा

वास्तुपुरुष गेला पंधरवडाभर अतिशय आनंदात होता. उपराळकर देवचाराने त्याच्या विचारांना दिलेली शाबासकी पाठीशी होतीच. शिवाय होळी, रंगपंचमी आणि इस्टर यांनी तर वातावरण आनंदमय केलं होतं. निसर्गही सर्वत्र रंगांची उधळण करत होता. केशरी पळसफुलांवर मधुपान करणारे हिरवे चुटूक पोपट फुलांचं ‘किंशुक’ नाव सार्थ करत होते. काटेसावरीचा बहर ओसरता ओसरता पक्ष्यांना आसरा दिला होता पंगाऱ्याच्या लालभडक फुलोऱ्याने. बाहाव्याच्या ‘गिरीमाला’ डोंगर उतारांवर पिवळी धमक ‘हळद’ चढवायला लागल्या होत्या. तकाकणाऱ्या हरित पर्णसंभारावर चांदण्यांसारखी फुललेली पांढरी शुभ्र करवंदफुलं आणि रानजाई परिसरात सुगंध उधळत होती. काजूंची कोवळी बोंडं आणि आम्रवृक्षांवर लगडलेल्या कैऱ्या वाऱ्यावर डुलत होत्या, गावातल्या भजनांच्या तालाला साथ देत. सर्वजण नववर्षाच्या आणि वसंत ऋतूच्या स्वागताला तयार होत होते. वास्तुपुरुषही तयार होता, नवविचारांची ‘गुढी’ उभारायला. आज त्याला उपराळकराच्या आणि पर्यायाने शंकेखोर ‘कोकणी’ माणसाच्या ‘तिरकट’ प्रश्नांची ओढ लागली होती. क्षेत्रपाळेश्वराच्या मंदिरात भजनात तल्लीन झालेला वास्तुपुरुष अचानक जंगली पिंगळ्याच्या कुकाऱ्याने भानावर आला. निसर्गदूताचं आवतण त्याच्या लक्षात आलं आणि त्या अंधारत चाललेल्या सांजवेळी त्याने कुकाऱ्यांच्या मागोव्यावर वाटचाल सुरू केली, उपराळकर देवराईच्या दिशेने. हळू हळू पानापानांमधून धरतीवर घरंगळणारे चांदण्यांचे किरण वाट दाखवायला लागले. मधूनच एखाद दुसरा काजवा डोळे मिचकावत, मस्करी करत, काही क्षण सोबत करत होता. सभोवार घनगंभीर झालं आणि देवचाराचा औदुंबरावरून आलेला हुंकार वास्तुपुरुषाला प्रफुल्लित करून गेला, “नमस्कार देवा महाराजा! तुझ्या कृपेने आणि निसर्गाच्या रंगावलींमुळे मन कसं बहरून गेलं आहे. शिवाय गावकऱ्यांच्या साध्या, सोप्या आणि रसाळ भजनांतून ‘वृक्षवल्ली’ तर माझे ‘सोयरे’ झाले आहेतच. मग उशीर कशाला त्यांच्या प्रश्नांना उत्तर द्यायला?”

धीरगंभीर आवाजात उपराळकराने सुरवात केली, “वास्तुपुरुषा, इथला कोकणी माणूस भाबडा आहे पण तो चौकस आहे. तुझ्या घरांच्या रचनेच्या मांडणीवर त्याने विचार केला, तुझे विचार त्यांना बरेचसे पटले आहेत पण त्यांचे अनेक प्रश्न आहेत. तू त्यांना मातीच्या भिंती आणि उतरतं

कौलारू छप्पर सुचवलं आहेस. आज मातीच्या भिंती उभारायला कारागिर कुठे आहेत? शिवाय कौलं परतायला वेळेवर मजूर मिळत नाहीत. मग आहेत वरून टपकणारे विंचू, उंदीर आणि पाठोपाठ येणारे साप. शिवाय पावसाळ्यात घरातसुद्धा पाण्याची रिपरिप. रहाशील का तू या सर्वांच्या सहवासात?" वास्तुपुरुष हसत उत्तरला, "माफ कर देवा महाराजा! ह्या प्रश्नांची जाणीव मलाही होतीच आणि पर्यायही समोर आहेत. मातीच्या भिंतींना समर्पक पर्याय म्हणजे मातीच्या वीटा, थोड्याशा मोठ्या आकाराच्या, थोड्या प्रमाणात चुना मिसळलेल्या, उन्हात सुकवलेल्या. लाकडाचे साचे करून हे मातीचे ठोकळे पटापट कोणालाही बनवता येतील. एकाद्या हुशार तरुणाला अगदी कमी भांडवलात हा उद्योगही करता येईल. बांधकाम नेहमीसारखंच, माती व चुना वापरून करता येईल. चुना मिळणं कठीण असल्यास कमी प्रमाणात सिमेंटही वापरता येईल. हेच भिंतींचं बांधकाम नाविन्यपूर्ण पद्धतीने, भिंतीत अधून मधून पोकळी ठेऊनही करता येईल. भिंतींच्या अंतर्भागातून हवा खेळती राहिल्यास भर उन्हाळ्यातसुद्धा खोल्यांमधून थंडावा राहील. छप्पराच्या रचनेत आपल्याला काही प्रमाणात तडजोड करावी लागेल. पाऊस भरपूर असल्यामुळे उतरतं छप्पर तर हवंच. मग ते सिमेंट–कॉंक्रिटच्या उतरत्या स्लॅबचं असू शकतं. त्यात लोखंडी सळ्यांऐवजी प्रक्रिया केलेले बांबू तणावाच्या आधारासाठी वापरता येतील. दुसरा पर्याय म्हणजे लाकडाच्याच चौकटीवर गंजरोधक प्रक्रिया केलेले लोखंडी किंवा इतर धातूंचे नळ्यांचे पत्रे वापरून उतरतं छप्पर करणं. या दोन्ही प्रकारच्या छप्परांवर बाहेरून कौलं बसवल्यास मध्ये हवेचा थर राहिल्याने आतील तापमान खूपच कमी राहील. वरच्या कौलांनाही दुसरा पर्याय म्हणजे नारळाच्या झावळ्या किंवा बांबूच्या चटयांनी छप्पर शाकारणं. यांवर प्रक्रिया करून त्यांचं आयुर्मान वाढू शकतं शिवाय ते अग्नीविरोधकही होतं. हे शाकारणीचं कौशल्य असणारे अनेक बुरुड आज कोकणात आहेत. त्यांनाही नाविन्यपूर्ण उद्योग मिळू शकेल. इथे कोणत्याही प्रकारच्या फटी नसल्याने विंचू, उंदीर, साप वरून घरात येण्याची भिती बाळगायला नको. हे सर्व बांधकाम साहित्य अगदी स्थानिक नाही, पण आज जवळपासच्या शहरात सहज उपलब्ध होऊ शकतं. ही उतरती छप्परं वेगवेगळ्या कोनांत, पातळ्यांत करून आकर्षक करता येतील. शिवाय छप्पराच्या मधल्या व उंचावरच्या भागात अर्धवट लपलेली वातायनं करून घराच्या अंतर्भागात शीतल प्रकाश आणि वायुवीजनही पुरवता येईल. "

"वास्तुपुरुषा, तुझे पर्याय ठीक आहेत, पण खर्चाचं काय? परवडणार कसं हे सर्व आम्हाला?", उपराळकराने आणखी एक मोडता घातला.

“देवचारा, खर्च कमी करण्याचे अनेक मार्ग आहेत.  पूर्वी सांगितल्याप्रमाणे स्थानिक बांधकाम साहित्य वापरल्यास खर्च खूप कमी होतो.  शिवाय स्थानिक साहित्याच्या अनोख्या स्व–सौंदर्याकडेही वेगळ्या दृष्टीने बघायला हवं आणि त्या सौंदर्याचा घरांच्या रचनेत वापर करायला हवा.  सर्व ठिकाणी गिलाव्याची, चकचकीत लाद्या लावण्याची, अवजड दरवाजे व खिडक्या लावण्याची गरज नसते.  आकर्षक जाळीकाम किंवा झरोके, खिडक्यांची गरज भागवताना खर्चही आटोक्यात आणतात.  आपलंच घर असल्याने आतील दरवाजे हे जड लाकडाऐवजी बांबू–तट्टयांचे करता येतील.  बसायला ओटे, बाकडे, झोपायला चौथरा बांधकामातच केल्यास खर्चही कमी होतो व देखभालीतही बचत होते.  शौचालय व स्नानगृह यांचा खर्च बराच असतो.  तो साधेपणाने साहित्य वापरून कमी करता येईल. सांडपाण्याचं शुद्धीकरण व पुनर्वापर, गरम पाण्यासाठी सौरऊर्जेचा किंवा पर्यायी ऊर्जेचा वापर यांनीही बरीच काटकसर करता येईल.  सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपली आर्थिक क्षमता ओळखून त्याप्रमाणेच घराची रचना करावी, भविष्यात वाढवण्याची, सुधारण्याची सोय ठेवावी आणि टप्प्याटप्प्याने गरजेनुसार व आर्थिक क्षमतेनुसार घर विकसीत करावं.  परंतु आर्थिक क्षमता वाढली म्हणून उधळपट्टी करून पर्यावरण विनाशाच्या मार्गाकडे जाऊ नये.  घर हे आपल्या सौख्यासाठी, मनःशांतीसाठी, निरामय व आनंदी जीवनासाठी असावं, ऐश्वर्याच्या प्रदर्शनासाठी नसावं.”

उपराळकराचं समाधान झाल्यासारखं दिसत होतं, पण आणखी एक किचकट प्रश्न वास्तुपुरुषाची परीक्षा घेणार होता.  “वास्तुपुरुषा, तुझी ही उत्तरं समाधानकारक आहेतच, पण तुझा तो सूर्यमार्गाप्रमाणे घररचना करायचा सिद्धांत जागेवर कसा अंमलात आणायचा हे काही आम्हाला समजत नाही.  आमच्याकडे काही वास्तुकलातज्ञ किंवा स्थापत्यतज्ञही नाहीत आणि ते आम्हाला परवडणारही नाहीत.”

वास्तुपुरुषाच्या अंगात आता उत्साह संचारला.  “देवचारा, विज्ञान सोपं करून सांगणं हेच तर माझं कर्तव्य आहे.  आज विज्ञानप्रसाराने अनेक गोष्टी सोप्या आणि सहज उपलब्ध केल्या आहेत.  त्यातही आधुनिक तंत्रज्ञान सोप्या मार्गाने घराघरात अगदी गावागावातही शिरलं आहे.  आज प्रत्येकाला स्वस्त किंमतीत भ्रमणध्वनी किंवा संगणकामार्फत आंतर्जालाशी संपर्क करून जगभरातील कोणत्याही विषयाची माहिती सहज मिळवता येते.  जगाच्या नकाशावर आपल्या घराच्या जागेचं अचूक ठिकाण व त्या जागेचे अक्षांश, रेखांश व समुद्रसपाटीपासूनची उंची यांची सहज नोंद करता येते.  त्या नोंदीचा वापर करून त्या ठिकाणच्या सर्वसाधारण हवामानाची नोंद करता येते.  शिवाय त्या जागेच्या सूर्यमार्गाचाही आराखडा काढता येतो.  अगदी

सर्वसामान्य माणूसही थोड्याशा मार्गदर्शनाखाली हे करू शकतो. मला वाटतं आज बऱ्याच खेडेगावातील शाळांमधूनही ही सोय उपलब्ध होत आहे आणि तिथले शिक्षकही या तंत्रज्ञानाचं कौशल्य मिळवत आहेत. पुढचं काम अगदी साधं आहे. आपल्या जागेच्या सूर्यमार्गाच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील मार्गाची आखणी प्रथम आपल्या जागेच्या नकाशावर करायची. नंतर सकाळी नऊ वाजता आणि संध्याकाळी तीन वाजतानाच्या सूर्याच्या स्थानाची या नकाशावर पूर्व आणि पश्चिमेला आखणी करायची, कारण या कालावधीत सूर्याची उष्णता सर्वाधिक असते. या आयताकृतीला म्हणायचं 'सूर्य गवाक्ष'. या 'सूर्य गवाक्षा'त सौरऊर्जा सर्वाधिक असते. आता आपल्या गरजेनुसार या 'सूर्य गवाक्षा'चा उपयोग करायचा. जर घरात सौरऊर्जेचा वापर करायचा असेल तर या गवाक्षक्षेत्रात कोणतीही सावली येणार नाही ही काळजी घ्यायची. उलट जर नैसर्गिक पद्धतीने घरातलं अंतर्गत वातावरण आरामदायक ठेवायचं असेल तर या गवाक्षक्षेत्रात वेगवेगळ्या मार्गाने सावली निर्माण करायची आणि घरात शीतलता राखायची. आपल्या जागेच्या अक्षांशावरून उन्हाळ्यातील व हिवाळ्यातील, उत्तर–दक्षिणेकडील सूर्यकिरणांचा कोनही आपण सहज काढू शकतो व त्यानुसार खिडक्या, दरवाजे, पडवी यांना योग्य रुंदीचे सज्जे किंवा झरोके–सज्जे योग्य ठिकाणी पुरवून सुर्यकिरण नियंत्रीत करू शकतो."

उपराळकर देवचाराने पुन्हा एकदा गोंधळल्यासारख्या आवाजात प्रश्न उभा केला, 'वास्तुपुरुषा, थोडसं समजलं पण अजूनही हा सूर्यमार्गाचा 'प्रकाश' आम्हा कोकण्यांच्या डोक्यात काही पडत नाही. आंतर्जालाच्या आणि संगणकाच्या घोळात न जाता हे कोडं सोडवायचा साधा मार्ग नाही का?" वास्तुपुरुषाने उत्साहात हे आव्हान स्विकारलं, "जरूर आहे सोपा मार्ग महाराजा. प्रथम आपल्या भूखंडातील घरासाठी राखून ठेवलेली मोकळी जागा आपण निश्चित करू. होकायंत्राचा वापर करून उत्तर दिशा किंवा २१ मार्च व २१ सप्टेंबरला होणाऱ्या सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या ठिकाणांवरून पूर्व आणि पश्चिम दिशा निश्चित करू. या पूर्व–पश्चिम रेषेच्या काटकोनात उत्तर–दक्षिण दिशा निश्चित करू. भूखंडाच्या सर्वसाधारण सीमेलगत झाडं असतीलच. नसल्यास सुमारे १० मीटर उंचीचे बांबू या सीमेलगत उभे करू. आता पहिलं निरीक्षण सकाळी ९ वाजता. पूर्वेकडील झाडांची किंवा बांबूची सावली जमिनीवर कुठवर पडते तिथे चुन्याने उत्तर–दक्षिण रेषा आखू. तशीच रेषा दुपारनंतर तीन वाजता पश्चिमेच्या बाजूला काढू. ह्या झाल्या 'सूर्य गवाक्षा'च्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील दोन बाजू. पुढचं निरीक्षण करूया २१ जूनला, जेव्हा सूर्य उत्तरेला कर्क वृत्तावर पोचला असेल व नंतर त्याचं दक्षिणायन सुरू होणार असेल. आता या दिवशीच्या उत्तरेकडील सीमेवरील झाडांच्या

सावल्यांच्या खुणा करू व उत्तर सीमेला समांतर पूर्व–पश्चिम रेषा काढू. पुढे अशीच रेषा दक्षिण सीमेलगत २१ डिसेंबरला काढू कारण या दिवशी सूर्य दक्षिणेला मकर वृत्तावर पोचलेला असेल व उत्तरायणाकडे वळणार असेल. आता आपलं 'सूर्य गवाक्ष' आपल्या भूखंडावर आखलं गेलं, जास्तीत जास्त सौरऊर्जा मिळणारा भाग कळला. पुढचे घराच्या आराखड्याचे समर्पक पर्याय आता घरमालकाने ठरवायचे."

उपराळकर देवचार खुशीत उद्गारला, "ही सौरऊर्जा इथल्या जैवविवीधतेला कशी निरोगी आणि कार्यरत ठेवते ही मी रोजच या देवराईत पहात असतो. इथल्या झाडांवरची शेकरूंची घरटी आणि शेकरूंचा त्यातला वावर पहाण्यासारखा असतो. त्यांच्या पाला पाचोळ्याच्या, काटक्यांच्या घरव्याला एका बाजूने येजा करायला छिद्र असतं, दरवाजाच म्हण ना. शेकरू रात्र घरव्यात घालवतात आणि सकाळी सूर्योदयाच्या वेळी त्यांना या दारातूनच सूर्यस्नान करायला आवडतं. मग सूर्याच्या उत्तरायण–दक्षिणायन या दिशागमनाप्रमाणे शेकरू आपापल्या घरव्यांच्या दरवाज्यांची दिशाही बदलत असतात."

"अगदी खरं आहे तुझं म्हणणं देवचारा. आजही आदिवासी, वनवासी मानव जमातीसुद्धा निसर्गाशी एकरूप होऊन रहातात, निसर्ग निरीक्षणातून आपली जीवन रहाणी संतुलित करत असतात. काही भटक्या जमातींच्या बांबू, गवत आणि पालापाचोळ्याच्या, शंकू आकाराच्या झोपड्या अशाच असतात. जिथे मुक्काम असेल तिथे, सहसा माळरानावर किंवा डोंगर उतारांवर या एका दरवाज्याच्या झोपड्या उभारल्या जातात. मग ऋतूनुसार व दिवसभर मर्यादित सौरऊर्जेसाठी ह्या दरवाज्याची दिशा सूर्याच्या दिशेनुसार बदलली जाते. संपूर्ण घरच स्वतःभोवती फिरतं. सौरऊर्जा किड्या–मकोड्यांना दूर ठेवते आणि मोकळ्या माळरानावरील रात्रीच्या थंडीत घर ऊबदार ठेवते. आधुनिक मानवसुद्धा निसर्ग निरीक्षणातून पर्यावरण जीवनशैली शिकू शकेल, त्याला विज्ञानाची, तंत्रज्ञानाची जोड देऊन जीवन अधिक आरोग्यदायी, आरामदायी करू शकेल."

"ओम् आदित्याय नमः ‖, ओम् भास्कराय नमः ‖, ओम् दिनकराय नमः ‖" उपराळकर देवचार आणि वास्तुपुरुषाने झऱ्यातलं पाणी ओंजळीत घेऊन उगवत्या सूर्याला एकत्रित धीरगंभीर आवाजात अर्घ्य अर्पण केलं. रानफणसाच्या तरुशिखरावरून कोवळ्या उन्हात सूर्यस्नान करणाऱ्या एका शेकरूने ध्यानस्थ वास्तुपुरुषाला हाक दिली आणि त्याला देवराईच्या सीमेपर्यंत नेऊन निरोप दिला. वास्तुपुरुष खूप समाधानात होता व पुढचा विचार करत होता. गावातल्या

पर्यावरणस्नेही घरांच्या पाठोपाठ आता इथल्या शहरांतील इमारतींचाही असाच विचार करायला हवा. जमेल का हे किचकट काम? दयाळ पक्ष्याच्या मधुर गीताने परिसर स्वरमय झाला, आशेचे सोनेरी किरण तर पूर्व क्षितीजावर उमललेले होतेच!

उल्हास राणे

२९ मार्च २०१६

'Brindavan', 227, Rajmahal Vilas Extn. – II
HIG Colony, First Main Road
Bengaluru – 560094
E-mail: ulhasrane@gmail.com
Mobile: +91 9448149236; +91 80 23417283